# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०२/०७/२०१८
## दि.०१/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ३२८/१८,भादविक २७९,३०४(अ),३३८,मोव्हे. १८४,१३२(१)(क), ११९/१७७ |
| **फिर्यादी** | तुकाराम टोणपे,सहा.पो.फौज. हिंजवडी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात चारचाकी वाहन चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/१०/२०१७ रोजी २१/३० वा. पाषाण सुस ब्रीज जवळ बेंगलोर-मुंबई हायवे रोडलगत असलेल्या ऑडी शो-रूम समोरील सर्व्हिस रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात चारचाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहने हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी एक अनोळखी पुरूष,वय अंदाजे २६ वर्षे,रंगाने सावळा,जाडसर बारीक मिशी, उंची ५.४, डोक्याचे केस वाढलेले,अंगात निळसर रंगाची जीन्स पॅन्ट,पांढरे रंगाचा मळकट शर्ट,त्यावर निळसर रंगाचे चौकटीचे डिझाईन असलेला यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून, त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. वाय.जी.रामेकर ९८८१२५३९६६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे १७३/१८,भादविक ३०६ |
| **फिर्यादी** | माधव सवंडकर,वय-२७ वर्षे,रा.भोसले वस्ती,चऱ्होली-बुद्रुक,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | भरत हनुमान काळे,वय-२९ वर्षे,रा.दाभाडे वस्ती,चऱ्होली-बुद्रुक,ता.हवेली,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०६/२०१८ रोजी १२/१५ ते १५/०० वा.चे दरम्यान दाभाडे वस्ती,चऱ्होली-बुद्रुक,ता. हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील १.मुक्ता उत्तम सुर्यवंशी,वय-३१ वर्षे,रा.भोसले वस्ती,चऱ्होली-बुद्रुक,ता.हवेली,जि.पुणे २.उत्तम तुकाराम सुर्यवंशी,वय-३३ वर्षे,रा.सदर हे दोघे पती-पत्नी असुन ते फिर्यादी यांचे सख्खी चुलत बहिण व दाजी आहेत. यातील नमुद इसम भरत काळे हा पी.सी.एम.सी. चे इलेक्ट्रीक कामाचे ठेकेदाराचा सब-कॉन्ट्रॅक्टर आहे. उत्तम सुर्यवंशी हे भरत काळे याचेकडे साईटवर इलेक्ट्रीकचे काम करीत असताना,त्यांना त्यांचे कामाचे पैसे दिले नाहीत यावरून त्यांचेत भांडणे होवुन वाद झाला होता. या कारणांनी सदर दोन्ही मयत पती-पत्नी यांनी त्यांचे राहाते घरी एकाच वेळी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.जे.शेंडगे ९३५६६१५८४० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दिघी पो स्टे १७४/१८,भादविक ४२०,१७०,३४ |
| **फिर्यादी** | कृष्णा ओव्हाळ,वय-२७ वर्षे,रा.काठोडा,ता.जि.बिड |
| **आरोपी** | दोन इसम व एक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०६/२०१८ रोजी १८/३० वा. दिघी मॅग्झीन चौक दिघी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद दोन अनोळखी पुरुष व एक अनोळखी महीला यांनी संगनमत करुन,फिर्यादी यांना आर.टी.ओ.चे कर्मचारी असल्याची बतावणी करुन,फिर्यादी यांचेकडील एक काळी-पिवळी पियोगो रिक्षा,तीचा इंजीन नंबर आर१सी२९३६७१५,चासी नं. झेड.एफ.सी.२८०४६९ पुढील बाजुचे काचेवर तन्वी असे मराठीतुन लिहीलेले,भगवे रंगाचे सीट कव्हर असलेले असे वर्णन असलेली ४०,०००/- रुपये किमंतीची पियागो रिक्षाची तपासणी करायाची आहे असे सांगुन,पियोगो रिक्षा फसवणुक करुन घेवुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पी.ए.कदम ८३०८९९६००७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**